## निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

१ प्रस्तुत अर्जान्वये वादी यांनी प्रतिवादीं विरुध्द तात्पुरत्या मनाई हुकूमाची विनंती केली आहे.

२ वादी यांचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे –

वादी नुसार मौजे ढोकसाळ, तालुका बदनापूर येथील मिळकत गट क्रमांक ६४ ही पुर्वीचा सर्वे क्रमांक ३१ असा होता व सदरील जमीन ही सरकारी गायरान जमीन होती. दिनांक ०८/०७/१९६५ रोजी शासनाने परीपत्रक क्रमांक ७४, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या आदेशानुसार सदर जमिनीपैकी प्रत्येकी २ हेक्टर जमीन वादी क्रमांक १ ते ३, ६ व ७ यांना तर प्रत्येकी २ हेक्टर २० आर जमीन ही वादी क्रमांक ४ व ५ यांना वाटप करण्यात आली आहे व त्यानुसार महसुल अभिलेखात फेरफार क्रमांक १९५ ची नोंद झालेली आहे. तेव्हापासून वादी हे गट क्रमाक ६४ मधील वरील नमूद क्षेत्राचे मालक व कब्जेदार झाले. (वरील नमूद मिळकतींना यापुढे वाद मिळकत असे संबोधण्यात येईल.) जमीन वाटप झाल्यापासून वादींच्या नावाची नोंद ही जमिनीच्या अभिलेखात मालक व कब्जेदार म्हणून दर्शविलेली असून वादी हे दावा मिळकतीची वहिती करतात व ते कायदेशीर कब्जेदार आहेत. जमिनीचे कायदेशीर कब्जेदार असल्यामुळे वादींनी या जमिनीमध्ये पिकांबाबत शासनातर्फे विविध पिकांचे अनुदान, पिक विम्याची रक्कम घेतलेली असून संबंधीत बॅकाकडूनही पिक कर्ज वेळोवेळी घेतलेले आहे. प्रतिवादी क्रमांक ५ व ६ यांचा या जमिनीशी काही एक संबंध नसतांनाही ते वादींच्या नावाने झालेला फेर क्र. १९५ हा बनावट असून सदर जमीन प्रत्यक्षात वादी क्रमांक ६ व इतरांच्या ताब्यात आहे असे दर्शवून ते प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांच्याकडे सदरचा फेर रद्द व्हावा म्हणून पाठपुरावा करीत आहे. मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी प्रतिवादी क्रमांक ५ व ६ यांच्या अर्जावरुन प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना ०८/०२/२०१७ रोजी पत्र पाठवून त्या विषयासंबंधीचे नियम व अद्ययावत शासन आदेश विचारात घेवून उचीत

कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल पाठवावा असा आदेश वादींना नोटीस न देता केला. प्रतिवादी क्रमांक १ तहसीलदार, बदनापूर यांना अशी चौकशी करण्याचा व त्यासंबंधीची कोणतीही कार्यवाही करण्याचे अधिकार नाही कारण त्यांच्या समकक्ष अधिकारी यांनी फेर क्रमांक १९५ मंजूर केलेला आहे. वादींना दावा जमिनीतुन बेकायदेशीररित्या बेदखल करण्याचे व त्या जागी ज्या व्यक्तींचा कुठलाही संबंध नाही अशा व्यक्तींच्या ताब्यात दावा जमीन देण्याचे प्रतिवादी क्रमांक १ ते ५ हे बेकायदेशीर प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादी क्रमांक ३ च्या आदेशानुसार प्रतिवादी क्रमांक १ ने अधिकार नसतांनाही फेर क्रमांक १९५ बाबत चौकशी सुरु केली असून २६/०९/२०१७ पर्यत वादींना सदर मिळकतीतुन बेदखल करण्याच्या धमक्या दिल्या. करीता वादींना सदरचा दावा व अर्ज देण्याव्यतिरीक्त कुठलाही पर्याय उरला नाही. प्रतिवादी हे अधिकाराचा गैरवापर करुन वादींना बेदखल करण्याचा प्रयत्न करीत आहेत व त्यामुळे वादींचे न भरुन येणारे नुकसान होईल. करीता दाव्याचा निकाल लागेपर्यत प्रतिवादींनी वादींना वाद मिळकतीमध्ये अडथळा निर्माण करु नये व बेदखल करु नये अशी मागणी केली आहे.

३ प्रकरणात हजर होवून प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांनी निशाणी २३ वर स्वतःचे लेखी म्हणणे दाखल करुन वादींचे सर्व आरोप नाकारलेले आहेत. प्रतिवादी क्रमांक १ ते ४ नुसार मौजे ढोकसाळ, तालुका बदनापूर, जिल्हा जालना येथील गट नंबर ६४ जिचे क्षेत्रफळ २९ आर २६ गुंठे आहे व पुर्वीचा सर्वे नंबर ३१ असुन सदरील जमीन ही गायरान जमीन असून ती सरकारच्या मालकीची आहे व अभिलेखातही मालकी हक्कामध्ये सरकारच्याच नावाची नोंद आहे. सदरील जमिनीचे वाटपाबाबतचे संपुर्ण हक्क प्रतिवादी क्रमांक ३ यांचाच आहे व त्यामुळे वादी हे वाद मिळकतीवर कोणतीही मालकी व ताबा सिध्द करु शकत नाहीत. प्रतिवादी क्रमांक १ ते ४ नुसार दिनांक ०१/०७/१९८८ रोजी मंजूर करण्यात आलेला फेर हा बनावट असून चुकीच्या माहिती आधारे घेण्यांत आलेला आहे. फेरफार क्रमांक १९५ चे

अभिलेखामध्ये बनावट नोंद घेतलेली आहे. यामध्ये वादींना वारंवार नोटीस देवून वादींना कागदपत्रासह हजर राहण्याबाबत कळविले आहे. तसेच वादींना सदर जमीन कशा आधारे वाटप करण्यांत आली व कशा आधारे वादींचा फेर घेण्यांत आला याबाबतची कागदपत्रे वादींनी चौकशीमध्ये सादर केलेली नाहीत व फेरफार क्रमांक १९५ हा बेकायदेशीर असल्यामुळे तो रद्द करण्यांत आला. उप विभागीय अधिकारी, जालना यांनी दिनांक २८/०२/२००७ रोजी निर्णय पारीत करुन त्याआधारे इतर काही लोकांची नांवे ७/१२ च्या उता–यावर घेवून सदरचा फेर २०/०३/२००७ रोजी मंजूर केला. प्रतिवादी क्रमांक १ ते ४ नुसार प्रतिवादी क्रमांक १ ला महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ अन्वये दुरुस्ती करण्याचे अधिकार असल्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ यांनी फेरफार क्रमांक १९५ वरील नोंद कमी करुन फेरफार क्रमांक ५९७ प्रमाणे नोंदी कायम केलेल्या आहेत. सदरील वाद मिळकतीशी वादींचा कोणताही हक्क संबंध नाही व सदरील वाद मिळकत ही शासनाची असल्यामुळे वादी हे शासनाविरुध्द मनाई हुकूम मागू शकत नाहीत.

४ प्रतिवादी क्र. ५ यास अद्यापही समन्सची बजावणी झालेली नाही. त्यामुळे वादींतर्फे निशाणी ३५ वर पुरशिस देण्यात आली व असे नमूद करण्यात आले की, प्रतिवादी क्र.५ विरुध्द वादींना तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज चालवावयाचा नाही.

५. प्रतिवादी क्र. ६ ला अनेक संधी मिळूनही प्रतिवादी क्र. ६ ने प्रकरणात त्याचे लेखी म्हणणे दाखल केलेले नाही. करीता प्रतिवादी क्र. ६ विरुध्द 'विना कैफियत' दावा चालविण्यात यावा असा आदेश निशाणी ०१ वर पारित करण्यात आला.

६ वादी व प्रतिवादी यांची कथने आणि उभय पक्षांच्या युक्तीवादावरुन अर्जाच्या निष्कर्षा करीता खालील मुद्दे उपस्थीत होतात. खाली दिलेल्या कारणास्तव त्यांचे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी यांना दाव्यामध्ये प्रथमदर्शनी बाजु असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | नाही |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे काय ? | नाही |
| ३ | तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास वादी पात्र आहेत काय ? | नाही |
| ४ | आदेश काय ? | अर्ज नामंजूर |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ ते ४ करीता

७ सर्व मुद्दे एकमेकांशी सलग्न असल्याने पुनरावृती टाळण्यासाठी या सर्व मुद्दयांची कारणमिमांसा एकत्रीत देण्यात येत आहे.

८ वादींनुसार जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या २१ मे १९७८ रोजीच्या आदेशानुसार त्यांन वाद मिळकत वाटप करण्यांत आली व तेव्हापासुन ते वाद मिळकतीचे मालक व काबीज झाले. तत्कालीन नायब तहसीलदार यांनी १९८८ साली वादींच्या नांवाचा फेर क्रमांक १९५ मंजूर केला. वरील नमुद बाबीच्या पृष्ठर्थ वादीने गट क्रमांक ६४ चे ७/१२ चे उतारे व फेरफार क्रमांक १९५ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे.

९ याउलट प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांनी वादींचा वादमिळकतीशी संबंध नाकारला असुन वादींच्या नावाने झालेला फेरफार क्रमांक १९५ हा बनावट आहे असे कथन केले व फेरफार क्रमांक १९५ ची दुसरी प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. ज्यामध्ये प्रतिवादींनुसार ज्यांना जमीन वाटप करण्यांत आली त्या लोकांची नांवे असून वादींची नांवे नाहीत. तसेच तहसीलदार, बदनापूर यांनी त्याच्याकडे झालेल्या चौकशीच्या रोजनाम्याच्या प्रती व तसेच प्रतिवादींनी दाखल केलेल्या फेरफार क्रमांक १९५ च्या पुष्ठयर्थ दिनांक २२/०६/१९५५ च्या हुकूमाची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. तसेच तहसीलदार,

बदनापूर यांनी दिनांक २६/०९/२०१७ रोजी संचिका क्रमांक २०१७/जमाबंदी/सि.आर.१५७ मध्ये दिलेल्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे.

१० वादींच्या मालकी व ताब्याची संपुर्ण भिस्त ही फेरफार क्रमांक १९५ व ७/१२ च्या नोंदीवर अवलंबुन आहे. परंतू वादींनी दाखल केलेल्या फेरफारातील नमुद आदेशाची प्रत वादींनी न्यायालयात दाखल केलेली नाहीत, तसेच वादीनुसार त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली सदरची कागदपत्रे मागीतलेली आहेत व वारंवार कागदपत्रे मिळण्यासाठी तहसील कार्यालयात अर्ज केलेले आहेत. परंतु या अर्जांच्या स्थळप्रती व त्यावर प्रतिवादींचा अर्ज प्राप्त झाल्याबाबतचा शेराही वादींनी पटलावर दाखल केलेले नाहीत. वादींच्या संपुर्ण ताब्याचा आधार हा जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे १९७८ चे पत्र व त्यानुसार जमीन मिळाली असा आहे. याउलट मात्र प्रतिवादींनी फेर क्रमांक १९५ चा अजुन एक फेरफार दाखल केला आहे ज्यामध्ये दिनांक २२/०६/१९५५ च्या आदेशाचा उल्लेख करण्यांत आलेला आहे व त्याच्या पृष्ठर्थ प्रतिवादींतर्फे दिनांक २२/०६/१९५५ च्या नक्कल हुकूम दर्शविणारी स्थळप्रत दाखविण्यांत आली ज्यामध्ये हरीजन व मागासलेल्या लोकांना गायरान जमिनी पट्टयावर देण्याबाबतचा उल्लेख आहे तसेच सदरचे पत्र हे तहसील कचेरी, जालना तहसीलदार यांनी ग्रामअधिकारी मौजे ढोकसाळ यांना निर्देशीत केलेले दिसून येते व याचा पत्रातील आदेशाचा उल्लेख प्रतिवादींनी दाखल केलेल्या फेरफार क्रमांक १९५ मध्ये दिसुन येतो. अशा परीस्थीतीमध्ये प्रथम दर्शनी वादीने दाखल केलेल्या फेरफाराच्या पृष्ठर्थ वादींनी कुठलाही आदेश दाखल न केल्यामुळे त्यास पुष्ठी मिळत नाही. तसेच प्रतिवादींतर्फे अजुन एक १९५ चा फेरफार दाखल झाल्यामुळे प्रकरणात संदिग्धता निर्माण होते.

११ वादींनुसार त्यांचा फेर १९८८ मध्ये घेण्यांत आला. करीता मी गट क्रमांक ७/१२ च्या उता–याचे अवलोकन केले तेव्हा असे लक्षात की, गट क्रमांक ६४ जेव्हा सर्वे क्रमांक ३१ होता तेव्हा त्यामध्ये मालक या सदरी केवळ ‘सरकार’ असे नांव असून कुळ व

इतर हक्कामध्ये गायरान व भागु वगैरे यांची वहिती असे निदर्शनास येते. तसेच मी सन १९८८ च्या ७/१२ च्या उता–याची छाननी केली असता वहीती करणा–याच्या नांवामध्ये बंडू नामदेव, समिंद्राबाई शंकर, सरकार अशी नांवे निदर्शनास येतात. वादींची नांवे ही जमीन करणा–यांच्या नांवामध्ये दिसून येत नाही. तसेच प्रतिवादींनी दाखल केलेल्या ७/१२ च्या उता–यामध्ये सन १९८८ ते २०१५–१६ पर्यंतच्या ७/१२ उता–यांचे अवलोकन केले असता त्यामध्ये मालकी हक्कात तसेच जमीन करणा–याच्या नांवामध्येही वादींच्या नांवाची नोंद दिसून येत नाही. तर सदरच्या ७/१२ च्या उता–यात भोगवटदाराचे नांव म्हणून सरकार, धोंडीबा आश्रु, बंडू नामदेव, समिंद्राबाई शंकर, भिल्ल स्मशान भूमी, साकराबाई मांदळे, इंदूबाई मांदळे, कौसल्याबाई, पद्माबाई अशी नांवे तर जमीन करणा–यांच्या नांवामध्ये ही बंडू नामदेव, समींद्राबाई, साकराबाई, इंदूबाई अशी बरीच नांवे निदर्शनास येतात. परंतु सदरच्या ७/१२ उता–यांची निक्षून छाननी केली असता त्यात वादींची नांवे दिसून येत नाहीत. याउलट वादींनी दाखल केलेल्या ७/१२ च्या उता–यांची छाननी केली असता त्यामध्ये फेरफार क्रमांक १९५ च्या आधारे भोगवटदाराचे नांव या सदरामध्ये वादींची नांवे दिसून येतात. परंतु जमीन करणा–याच्या सदरामध्ये मात्र बंडू नामदेव, समिंद्राबाई, सरकार, अशा नोंदी सन २००० पर्यत दिसून येतात. करीता एकाच गटातील सारख्याच वर्षातील ७/१२ उता–यांच्या फरकामुळे प्रकरणामध्ये संदिग्धता निर्माण होते.

१२ वादींनुसार वादी हे कायदेशीर कब्जेदार असल्यामुळे त्यांना विविध पिकांचे अनुदान, पिक विम्याची रक्कम तसेच बँकाकडून पिककर्जाची रक्कमही मिळाली आहे. परंतु या संबंधीही वादींनी कोणतेही कागदपत्र पटलावर दाखल केलेले नाहीत. ज्याने की त्यांचा वाद मिळकतीशी संबंध त्यांना दर्शविता आला असता. तसेच सर्वात महत्वाची नमुद करण्याजोगी बाब म्हणजे एकुण वादी हे ७ आहेत व प्रत्येकाचे क्षेत्रफळ हे गट क्रमांक ६४ मध्ये वेगवेगळया ठिकाणी आहेत. परंतु वादींतर्फे देण्यांत आलेल्या दाव्यात व अर्जामध्ये प्रत्येक वादीच्या

क्षेत्राच्या चतुःसिमा दर्शविण्यांत आलेल्या नाहीत. याउलट वादींतर्फे जमिनीचे वर्णन दर्शविण्यासाठी गट क्रमांक ६४ चा हाताने काढलेला एक नकाशा दाखल करण्यात आलेला आहे ज्यामध्ये वादींच्या हिश्यांचे क्षेत्र दर्शविलेले आहे. सदरचा नकाशा हा वादपत्राचा एक घटक समजण्यात यावा असे वादींनी वादपत्रात व या अर्जात नमूद केले आहे. वादीनुसार सदरची जमीन ही त्यांना जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या आदेशानुसार वाटप झाली आहे. परंतु वादींनी त्यांना झालेल्या जमीन वाटपाबाबतचे कागदपत्र दाखल केलेले नाहीत. ज्यामध्ये वादी त्यांच्या हक्कात करुन दिलेली ताबा पावती, जायमोक्यावर ताबा देतांना झालेल्या पंचनाम्याच्या प्रती या कागदपत्रांचा सर्व साधारणतः समावेश होतो जेणेकरुन नेमका कोणता वादी हा कोणत्या चतुःसिमेच्या आत ताब्यात आहे हे स्पष्ट झाले असते. हाताने काढलेल्या नकाशावरुन प्रत्येक वादींच्या चतुःसिमेचा बोध होत नाही कारण हाताने काढलेल्या नकाशाला पुष्टी देणारा कुठलाही सरकारी कागदोपत्री पुरावा पटलावर उपलब्ध नाही.

१३ तसेच वादींचा फेरफार क्रमांक १९५ हा तहसीलदार, बदनापूर यांनी दिनांक २६/०९/२०१७ रोजी रद्द केला. वादी नुसार असे कथन करण्यांत आले की, वादींना तहसीलदारांनी संचिका क्रमांक २०१७/जमाबंदी/सि.आर.१५७ मध्ये त्यांची बाजु मांडण्यासाठी संधी मिळाली नाही, परंतु प्रतिवादींनी दाखल केलेल्या रोजनाम्याच्या प्रतिवरुन असे निर्दशनास येते की दिनांक १२/०९/२०१७ रोजी सदरच्या वादींनी त्यांच्याकडे मुळ कागदपत्र नसल्याचे सांगीतले व सदरची कागदपत्रे सादर करण्यासाठी वेळ मिळावा अशी विनंती केली. त्यावर त्यांना १५ दिवसांचा कालावधी देण्यांत आला असे निदर्शनास येते. तसेच त्या रोजनाम्यांच्या प्रतिवर वादींच्या सहया आहेत. दिनांक २६/०९/२०१७ रोजी ही सुनावणीच्या वेळी वादी हे प्रकरणात हजर होते व वादींसमक्ष निर्णय झालेला आहे असे निदर्शनास येते. कारण दिनांक २६/०९/२०१७ रोजीच्या रोजनाम्यांच्या प्रतीवर वादींच्या सहया आहेत. तहसीलदार, बदनापूर यांच्या न्यायानिर्णयाचे अवलोकन केले असता असे

निदर्शनास येते की, तहसीलदार, बदनापूर यांनी त्यांच्या न्यायनिर्णयामध्ये असा निष्कर्ष नोंदविला की, वादींचा फेर क्र. १९५ हा बनावट असून वादींकडे जमीन वाटप झाल्याबाबतचा कोणताही सक्षम पुरावा नाही व मुळ अभिलेखामध्ये तपासणी केली असता सदर व्यक्तींना गट क्र. ६४ मधील शासकीय गायरान जमीन वाटप झाल्याचे दिसून येत नाही.

१४ तहसीलदार, बदनापूर यांनी रद्द केलेला फेर क्र. १९५ विरुध्द वादींनी अपील दाखल केलेले आहे किंवा नाही याबाबतही पटलावर कागदपत्र उपलब्ध नाहीत.

१५ करीता वरील नमूद कारणमिमांसेवरुन व तथ्यावरुन असे निदर्शनास येते की, वादींना स्वतःची बाजू प्रथम दर्शनी असल्याबाबतचे सिध्द करता आलेले नाही. त्यामुळे वादी यांना प्रथम दर्शनी दावा नसल्याचे स्पष्ट होते. सबब न्यायाचे पारडे हे वादी यांच्या बाजूने झुकलेले नाही हे देखील स्पष्ट होते व त्यामुळे मागणी केल्याप्रमाणे मनाई हुकूम न दिल्यास पैश्याच्या स्वरुपात भरुन न निघणारे नुकसान वादी यांचे कसे होईल? हे मात्र वादींनी स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे तिन्ही मुद्दयांकरीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवुन मी मुद्दा क्र. ४ च्या निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वा/-२०/१२/१७

दिनांक – २०/१२/२०१७ **(श्रीमती कांचन एस. झंवर)**

५ वे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर

जालना

**प्रमाणपत्र**

शपथेवर निवेदन करण्यात येते की, सदर पी.डी.एफ.संचिकेतील मजकुर मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव पुष्पा ति. बुरा
न्यायालयाचे नाव ५ वे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर),जालना.
पी.डी.एफ.दिनांक २०/१२/२०१७

स्वा/–२०/१२/१७
(पि. टी. बुरा)
लघुलेखक